# - कालिदासाचे अलंकार व तत्त्वज्ञान -

कालिदासाचे अलंकार व तत्त्वज्ञान -

कालिदासाचा "तत्त्वज्ञानाचा" सखोल अभ्यास होता हे आपण मागे पाहिलेच आहे. एवढेच नव्हे तर त्याने या तत्त्वज्ञानातून आपल्या साहित्यांत उपमा घेतल्या आहेत असे दिसते. या उपमा त्याच्या पात्रांची गुणवैशिष्टयेच व्यक्त करणाऱ्या आहेत. उदा.

मङ्गलालङ्कृता भाति कौशिक्या यतिवेषया ।
त्रयी विग्रहवत्येव सममध्यात्मविद्यया ।। मालविका. १/१४

- "मंगल अलंकार ल्यालेली मुनिवेषांतील कौशिकीसह शरीरधारिणी त्रयीविद्या अध्यात्मविद्येसह जणू शोभत आहे ।"

या श्लोकांत अग्निमित्र राजाने आपली पत्नी धारिणी हिला दिलेली त्रयीविद्येची उपमा व पंडित कौशिकीला दिलेली अध्यात्मविद्येची उपमा, कवीचा अध्यात्मविद्येचा अभ्यास होता हेच सिध्द करते.

तसेच तारूण्यामध्ये कालिदासाने विषयसुखाचा भरपूर आस्वाद घेतला असला तरी उत्तरार्धात त्याला तपोवनांतील जीवनासंबंधी नितांत आदर वाटू लागला होता व मोक्षप्राप्तीची तळमळ लागली होती हे त्याच्या "रघुवंश" या महाकाव्यावरून व "अभिज्ञानशाकुंतलांत" त्यानी भगवान् शंकराजवळ "पुनर्जन्मातून मुक्तता" करण्याच्या केलेल्या मागणीवरून वाटते.

ममापि च क्षपयतु नीललोहित:
पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभू: ।। अभि. शां. ७/३५

या संदर्भात पुढील श्लोकांत रघु व अज राजाला दिलेल्या उपमा विचारात घेण्यासारख्या आहेत.

यतिपार्थिवलिङ्गधारिणौ ददृशाते रघुराघवौ जनै: ।

अपवर्गमहोदयार्थयोर्भुवमंशाविव धर्मयोर्गतौ ॥ रघु. ८/१६

– "यति व राजा यांची दर्शक चिन्हे धारण करणारे ते रघु व राघव ह्यांना ते निःश्रेयस् व अभ्युदय ही फळे असलेल्या धर्मांचे भूलोकी अवतरलेले अंशच की काय असे त्यांचे प्रजाजन पाहते झाले."

या श्लोकांत आलेला निःश्रेयस् हा शब्द किंवा रघु ला दिलेली निःश्रेयस्‌ची उपमा ही कालिदासाचा वैदिक धर्मांचा अभिमानच प्रकट करते.

रघुवंशाच्या ११ व्या सर्गांतही राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्या विवाहानंतर त्यांचा वधूंशी झालेला समागम पाहून त्यानां कालिदासाने दिलेली उपमा ही सांख्य तत्त्वज्ञानाशी निगडित आहे. या श्लोकांत तो म्हणतो,

ता नराधिपसुता नृपात्मजैस्ते च ताभिरगमन्कृतार्थताम् ।
सो भवद्वरवधूसमागमः प्रत्ययप्रकृतियोगसन्निभः ॥ रघु. ११/५६

– त्या राजकन्यां राजपुत्रांच्या योगाने व ते राजपुत्र त्या राजकन्यांच्या योगाने [एकमेकांला] कृतकृत्य मानतीं झालीं आणि तो वर आणि वधू याचा समागम प्रत्यय आणि प्रकृति यांच्या संयोगाप्रमाणे झाला.

या श्लोकांत वर आणि वधू यांना दिलेली प्रत्यय आणि प्रकृति यांची उपमा कालिदासाचा "सांख्य तत्त्वज्ञानाचा" अभ्यासच सूचित करते.

रघुवंश हे कालिदासाचे महाकाव्य त्याने इतर सर्व ग्रंथरचनेनंतर रचले असावे असे म्हटले जाते. यात दिसून येणारे त्याचे परिणतप्रज्ञत्व व प्रतिभाशालित्व लक्षांत घेता ही गोष्ट पटण्यासारखी आहे. तसेच या काव्यांत वर्णन केलेल्या जवळ जवळ सर्वच राजांची जीवन जगण्याची पद्दती, त्यांचे ध्येय, त्यांचे विचार, या सर्वांच्या मध्ये जो एक गंभीरपणा, शांतपणा कवीने रंगवला आहे, यावरून कालिदासाच्या

विचारालाही परिपक्वता, प्रौढपणा आल्यानंतर, संपूर्ण जीवनाचा अर्थ त्याला समजल्यानंतर हे काव्य त्याने रचले असावे यात शंका उरत नाही. वेगवेगळया श्लोकांत तत्त्वज्ञानाला अनुसरून दिलेल्या उपमा हीच गोष्ट सिध्द करतात. श्रुति व स्मृति यांना अनुसरून आलेला रघुवंशातील पुढील श्लोकही या संदर्भात पाहण्यासारखा आहे.

> तस्याः खुरन्यासपवित्रपांसुमपांसुलानां धुरि कीर्तनीय ।।
> मनुष्येश्वरधर्मपत्नी
> मार्गं श्रुतेरिवार्थं स्मृतिरन्वगच्छत् ।। रघु. २/२

– "श्रुतीने पूर्वी प्रतिपादित जो अर्थ त्यालाच अनुसरुन जशी स्मृति प्रवृत्त झालो त्याचप्रमाणे धेनूच्या खुरन्यासाने पवित्र झालेल्या पायधुळीच्या मार्गाचे अनुसरण दिलीप राजाची पत्नी सुदक्षिणा हिने केले."

श्रुति– वेद हा अत्यंत अवघड म्हणून मनू इ. ज्ञानसंपन्न व्यक्तींनी श्रुतीचा अर्थ मनांत धरून तदनुसार धर्मप्रतिपादक अशी व्यवस्थित व संक्षिप्त व सुलभ अशी स्मृतिरचना करून धर्मशास्त्र प्रवृत्तींत आणले ही गोष्ट लक्षांत घेऊन कविने स्मृतीची उपमा सुदक्षिणेला दिलेली आहे. अशा प्रकारे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातून त्याने उचललेल्या उपमा पाहून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतील त्याचा अधिकार लक्षांत येतो, आणि कालिदास या ही म्हणजे सांप्रदायिक व अध्यात्मिक दृष्टीकोनातून "तत्त्वज्ञ" होता हेच सिध्द होते. रघुवंशामधील असे अनेक श्लोक त्याचे "तत्त्वज्ञत्व" सिध्द करतात. उदा.

> प्रसितावुदयापवर्गयोरुभयीं सिध्दिमुभाववापतुः । रघु. ८/२३

– "अभ्युदय व मोक्ष यांचे बाबतीत तत्पर असलेले ते अज व रघु दोघे अभ्युदय व मोक्षरूप दोन्ही प्रकारची सिध्दी मिळवते झाले." इ.

"अभिज्ञान शाकुन्तलां"मध्येही असे कांही श्लोक आहेत की जे त्याची तपोवनाविषयीची तळमळ प्रकट करणारे आहेत आणि त्याची धार्मिक श्रध्दा प्रकट करणारे आहेत.

दिष्टया शकुन्तला साध्वी, सदपत्यमिदं भवान् ।
श्रध्दा, वित्तं विधिश्चेति त्रितयं तत्समागतम् ।। अभि. शां. ७/२९

- "साध्वी शकुन्तला, हा गुणी पुत्र, आणि स्वत: तू । श्रध्दा, वैभव आणि कर्मानुष्ठान या ३ गोष्टींचा भाग्यानेच संयोग झाला ।" [मरीच]

याच नाटकाच्या ६ व्या अंकात स्वत:ला संतति नसल्यामुळे आपल्या ऐश्वर्याचे पुढे काय होणार ? या विचाराने चिंतित झालेल्या राजाने आपल्या भवितव्याबद्दल काढलेले उद्गार हे कालिदासाचा वेदविहित धर्मावरचा विश्वास व्यक्त करण्यास पुरेसे आहेत.

अस्मात्परं बत यथाश्रुति संभृतानि
को न: कुले निवपनानि नियच्छतीति ।
नूनं प्रसूतिविकलेन मया प्रसिक्तं
धौताश्रुशेषमुदकं पितर: पिबन्ति ।। [अभि. शां. ६/२५]

- "याच्यानंतर आमच्या घराण्यात वेदविहीत तर्पण करून आम्हांला कोण बरे तिलांजली देणार ? याच विचाराने माझे पितर माझ्यासारख्या निपुत्रिकाने तर्पणाच्या वेळी दिलेल्या पाण्याने स्वत:चे अश्रु धुवून ते उरेल तेवढेच पाणी पीत असतात.

या श्लोकांत "पुत्रप्राप्तिशिवाय मुक्ति नाही" ही धर्मशास्त्रातील कल्पना त्याला मान्य होती असे दिसते.

या सर्व विविध श्लोकांवरून आणि त्याच्या ग्रंथात आढळणाऱ्या इतर श्लोकांवरून त्याचा मनुस्मृति, धर्मशास्त्र, अध्यात्मशास्त्र इ. विषयीचा अभ्यास प्रकट होतो.